*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

***NAVJYOT / Vol. XII / Issue - II*** ***ISSN 2277- 8063***

# स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महाराष्ट्रामधील सामाजिक चळवळीचे नेतृत्व: एक अभ्यास

**संजय बाळगोंडा खोत,** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

**प्रस्तावना :**

एकोणिसाव्या शतकापासूनच हिंदुस्थानमधील विविध क्षेत्रात बदल घडून आले. झालेल्या बदलांमुळे देशाचा कायापालट होण्यास प्रोत्साहन मिळाले. एकोणिसाव्या शतकांच्या सुरुवातीलाच ईस्ट इंडिया कंपनीने आपली राजवट प्रस्थापित केली. ब्रिटिश राजवटीसमवेत युरोपातील प्रबोधन विचारही भारतामध्ये प्रवेशित झाले. मिशनऱ्यांनी शैक्षणिक कार्याला सुरुवात केली. यामुळे भारतामधील युवकांना उदारमतवादी आणि पुरोगामी विचारांचे बाळकडू शिक्षणामधून मिळू लागले. इंग्रजीच्या शिक्षणामुळे नविन शिक्षित पिढी निर्माण झाली. यामुळे समाजात बदल घडून येवू लागले. सामाजिक परिवर्तन घडून येण्यासाठी सामाजिक चळवळीचे योगदान महत्त्वाचे ठरते. यामध्ये कामगार चळवळ, शेतकरी चळवळ, दबाव गट, सामाजिक न्याय नेतृत्व, अंधश्रद्धा निर्मुलन व भ्रष्टाचार निर्मुलन, असंघटीत कामगार इत्यादी चळवळी निर्माण झालेत.

महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी देशात सर्वात आघाडीवर आहेत. महाराष्ट्रातील सामाजिक चळवळ देशात अग्रेसर असण्याचे प्रमुख श्रेय प्रामुख्याने या चळवळीला लाभलेल्या थोर समाजसेवक अण्णा हजारे, बाबा आढाव, मेधा पाटकर तसेच शरद जोशी, राजु शेट्टी, भारत पाटणकर याशिवाय कर्मवीर भाऊराव पाटील, मामासाहेब जगदाळे, बापुजी साळुंखे यांच्यासारख्या थोर नेतृत्वाची परंपरा असलेल्या विचार आणि कार्याला द्यावे लागेल. महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीला स्वातंत्र्योत्तर काळात महत्व प्राप्त झाले आहे. परिणामी महाराष्ट्रातील सर्वच क्षेत्रात वाखाणण्याजोगी प्रगती झाली आहे. प्रस्तुत शोधनिबंधात स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीचे नेतृत्व: एक अभ्यास याचा संक्षिप्त स्वरुपात आढावा घेण्यात आला आहे.

**महत्त्वाच्या संज्ञा :**

शेतकरी चळवळ, दबाव गट, सामाजिक न्याय नेतृत्व व भ्रष्टाचार, शैक्षणिक चळवळ इत्यादी.

**उद्दिष्टे :**

१) स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक चळवळीचा अभ्यास करणे.

२) स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक चळवळीचे स्वरूप जाणून घेणे.

**गृहितके :**

१) स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक चळवळीला राजकीय मर्यादा आहेत.

२) स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक चळवळीचे स्वरूप हे दबाव गट (प्रेशर ग्रुप) किंवा हितसंबंधी गट (इंटरेस्ट ग्रुप) असे राहिले आहे.

**अभ्यासाची व्याप्ती :**

सदर शोधनिबंधाची व्याप्ती महाराष्ट्र राज्याशी संबंधित असून स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सामाजिक चळवळीतील नेतृत्वाशी आहे.

**विषय प्रवेश :**

आधुनिक काळामध्ये स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये समाजातील सार्वजनिक समस्या सोडवण्यासाठी सामाजिक चळवळी निर्माण झाल्या आहेत. शेतकरी चळवळ/कृषी चळवळ, शैक्षणिक चळवळ, कामगार चळवळ, पर्यावरणवादी चळवळ व भ्रष्टाचार निर्मुलन चळवळ इत्यादी चळवळी निर्माण झाल्या.

**शेतकरी चळवळ/कृषी चळवळ :**

**प्रस्तावना :**

स्वतंत्र महाराष्ट्र निर्मितीमध्ये स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे मोलाचे योगदान आहे. तसेच कृषी आद्योगिक समाजासाठी उल्लेखनिय कामगिरी बजावली आहे. तसेच वसंतदादा पाटील यांचेही योगदान राहिले आहे. कृषी व आद्योगिकरणासाठी विशेष प्रयत्न झाले आहेत.

**१) शरद अनंतराव जोशी :**

शरद अनंतराव जोशी हे महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीमधील कर्तबगार नेतृत्व म्हणून ओळख निर्माण झाली आहे. तसेच ते भारतीय राजकारणी होते. त्यांनी स्वतंत्र भारत पक्ष आणि शेतकरी संघटना स्थापन केली होती. ते राज्यसभा सभागृहाचे सदस्य म्हणून नेतृत्व केले होते. महाराष्ट्रातील शेतकरी संघटना संस्थापक होते. राज्यातील शेतकऱ्यांना देऊ केलेल्या किंमतीच्या मुद्यांवर महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, राजस्थान, पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश, बिहार, उत्तर प्रदेश, ओरिसा, आंध्रप्रदेश या (१४) चौदा ७ राज्यातील भगिनी संघटनानी बनलेल्या किसान समन्वय समिती (KCC) चे ते संस्थापक होते. शेतीमालाला किफायतशीर किंमतीसाठी व वीजदर वाढ विरोधात आणि ग्रामीण कर्जाच्या माफिसाठी आंदोलने केली.

शरद जोशी यांचे नेतृत्व आर्थिक उदारमतवादी होते. भारतीय शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळाल्यास भारतीय शेती आर्थिक संपन्न बनू शकते. असे त्यांचे ठाम मत होते. त्यांनी त्यांच्या मृत्यूपत्रात बहुतेक मालमत्ता शेतकरी ट्रस्टकडे सुपूर्द केली. कारण त्यांचे शेतकरी चळवळीचे कार्य अविरतपणे चालू राहावे. (en.m.wikipedia.org)

**२) राजू शेट्टी :**

राजू शेट्टी हे पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचे नेतृत्व करत आहेत. त्यांनी प्रथम जिल्हा परिषद सदस्य बनून राजकीय प्रवेश केला. नंतर शिरोळमतदार संघातून विधानसभा सदस्य बनले. नंतर १५ व्या लोकसभेमध्ये हातकणंगले लोकसभा सदस्य बनले. राजू शेट्टी हे शेतकरी चळवळीतील राजकीय सजग नेतृत्व आहे. ते स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक आहेत. पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात ऊस शेती आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांना त्यांनी पिकवलेल्या ऊस पिकाला हमीभाव मिळावा यासाठी आंदोलने केली व शेतकऱ्यांना त्यांच्या ऊस पिकाला जादा भाव मिळावा यसाठी साखर कारखानदार यांच्याबरोबर संघर्ष केला आहे. सामाजिक चळवळीमध्ये शेतकरी चळवळ पुढे नेण्यासाठी राजू शेट्टी यांचे मोलाचे योगदान आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील या स्वाभिमानी नेतृत्वामुळे शेतकरी संपन्न बनत आहे. तसेच शेतकरी सुखी होण्यासाठी त्यांच्या शेती उत्पादनाला योग्य बाजारपेठ व योग्य भाव मिळावा यासाठी सतत प्रयत्नशील असणारे नेतृत्व म्हणून राजू शेट्टी यांच्याकडे पाहिले जाते. तसेच महाराष्ट्रात शेतकरी संघटना जागृत ठेवण्याचे कार्य होताना दिसते. (marathimirror.com)

३) महाराष्ट्र राज्यामध्ये शेतकरी चळवळीमध्ये रघुनाथदादा पाटील हे नेतृत्व कार्यरत असल्याचे दिसते. शेतीमालाला आधारभूत किंमत मिळावी यासाठी सतत सरकारशी संघर्ष करणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहिले आहेत. (m.maharashtratimes.com)

**शैक्षणिक चळवळ :**

**१) कर्मवीर भाऊराव पाटील** हे एक महाराष्ट्रातील समाजसुधारक आणि शिक्षण प्रसारक होते. महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या बैठकीत रयत शिक्षण संस्थेची स्थापना झाली. शिक्षण हे बहुजन समाजाच्या उद्धाराचे मुख्य साधन आहे. हा महात्मा फुले यांचा सत्यशोधकी विचार घेवून बहुजन समाजामध्ये ज्ञानाची गंगा घरोघरी पोहचविण्याचे कार्य रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केले. ते महात्मा गांधी यांच्या विचाराने प्रेरित झालेले गांधीवादी कार्यकर्ते होते. राजर्षि शाहू महाराजांच्या नावाच्या वसतिगृहाचे उदघाटन करण्यास महात्मा गांधी आले होते तेव्हा, "अपने शाहू से नाम देने के लिए कितना धन लिया", असा प्रश्न महात्मा गांधीनी कर्मवीरांना विचारला त्यावेळी "मैंने शाहू से बडा धन नहीं लेकिन बडा दिल लिया है". असे कर्मवीर उत्तरले या प्रसंगातून कर्मवीरांच्या हृदयात शिक्षणाबद्दलचा असणारा उदारमतवादी दृष्टिकोण प्रतीत होतो. मी बहुजनांची मुले शिकवीन असे ते नेहमी म्हणत या वाक्यावरून त्यांच्या मनात बहुजनांच्या शिक्षणाबद्दलचा कळवळा दिसून येतो.

दुसऱ्यांना मागासपणाबद्दल जबाबदार ठरवण्यापेक्षा 'स्वावलंबन' हे ब्रीद व व्रत केल्यानेच उद्धार होवू शकतो असा ध्येयवाद कर्मवीर भाऊराव पाटीलांचा होतो.

**२) शिक्षण महर्षी डॉ. बापुजी साळुंखे :**

महाराष्ट्राला ग्रामीण शिक्षणाची वैभवशाली परंपरा आहे. या परंपरेतील एक ज्ञानतपस्वी म्हणजे शिक्षण महर्षी डॉ. बापुजी साळुंखे होय. १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात महात्मा गांधीजीच्या आव्हानाला प्रतिसाद म्हणून घोरपडे

राज्यघराण्याचे राजगुरु पदाची नोकरी सोडून डॉ. बापुजी साळुंखे काँग्रेस चळवळीमध्ये सहभागी झाले ते सातारा जिल्हा विद्यार्थी काँग्रेस अध्यक्ष होते. स्वातंत्र्य चळवळीत कार्य करत असताना बापुजी साळुंखे यांचा संपर्क कर्मवीर भाऊराव पाटील यांचाशी आला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर "बापुजी आम्हाला राजकारणासाठी द्या" असे कर्मवीर भाऊराव पाटीलांना शेतकरी कामगार पक्षाचे नेते शंकरराव मोरे म्हटले यावेळी "एक वेळ मी राजकारणात येईन पण बापुजीना मी देणार नाही". असे कर्मवीर म्हटले या प्रसंगावरून बापुजींचे शैक्षणिक गुणवत्ता दिसून येते. १९५४ पर्यंत बापुजी साळुंखे रयत शिक्षण संस्थेमध्ये शिक्षक म्हणून निष्ठेने कार्य केले. सन १९५४-५५ या साली कराडच्या मुरलीधर मंदिरात श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. बापुजीनी शिक्षण प्रसाराच्या कार्यासाठी शहरी भाग न निवडता उपेक्षित असणारा डोंगरी, दुष्काळी आणि आदिवासी भागात शिक्षण प्रसाराचे कार्य केले.

बापुजी साळुंखे यांच्या या शैक्षणिक कार्याने ग्रामीण भागातील, डोंगरी भागातील, दुष्काळी भागातील व आदिवासी भागातील युवकांना शिक्षणाची संधी प्राप्त झाली. आणि याच शिक्षणाच्या माध्यमातून सामान्य कुटुंबातील विद्यार्थी साता समुद्रापार जावून आपली स्वप्ने पूर्ण करू लागली. यामध्ये बापुजी साळुंखे यांचे योगदान अमूल्य आहे.

**३) कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे :**

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे शैक्षणिक कार्याचे योगदान महाराष्ट्र राज्याला प्रोत्साहन देणारे आहे. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या आणि गरजू गरीब मुलांच्या शिक्षणाप्रती १९३४ मध्ये बार्शी या ठिकाणी श्री शिवाजी बोर्डिंगची स्थापना करून समाजातील युवकांना शिक्षणाची संधी प्राप्त केली. मामासाहेब यांच्यावर छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा प्रभाव होता.

१९३४ साली सुरु केलेल्या श्री शिवाजी मराठा बोर्डिंग म्हणजे प्राचीन गुरुकूल पद्धतीचे पुनरुजीवन झाले हे बोर्डिंग स्वातंत्र्यपूर्व काळात एक क्रांति केंद्र म्हणून निर्माण झाले होते. कर्मवीर मामासाहेब यांनी स्वत:पेक्षा जास्त इतरांना सक्षम बनविण्यासाठी कार्यरत राहिले. त्यांच्या सातत्यपूर्ण कार्यामधूनश्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ विस्तारित होवून नावारुपाला आली हे मामासाहेब जगदाळे यांचे योगदान आहे. या भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठीचे वरदान म्हणून हे शिक्षण मंडळ कार्यरत आहे. (sos.ac.in)

**४) मेधा पाटकर :**

मेधा पाटकर या भारतातील सामाजिक कार्यकर्त्या आहेत. आदिवासी, शेतकरी आणि भारतात अन्याय सहन करणाऱ्या महिलांसमोर उपस्थित झालेल्या विविध महत्त्वपूर्ण समस्यांवर कार्य करतात. मध्यप्रदेश, महाराष्ट्र व गुजरात या तीन राज्यामधील नर्मदा बचाव आंदोलन नावाची चळवळीचे संस्थापक सदस्य म्हणून नेतृत्व करतात. सरदार सरोवर धरण प्रकल्पासंदर्भात विस्थापित झालेल्या लोकांच्या न्याय हक्कासाठी संघर्ष करत आहेत. नर्मदा बचाव आंदोलन ही एक सामाजिक चळवळ असून याचा मुख्य उद्देश धरण प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या लोकांचे पुनर्वसन व्हावे हे आहे. १९९५ साली नर्मदा खोऱ्यामधील आदिवासी, शेतकरी, मत्स कामगार, मजूर व पर्यावरणवादी, मानवाधिकार कार्यकर्ते, बुद्धि जीवी यांचा समावेश करून सुरु झाली. दिर्घकाळ संघर्ष सुरु असून यामध्ये काही प्रकल्पग्रस्थांना जमिनीच्या आधारे पुनर्वसन मिळाले आहे. पण अद्यापही संपूर्ण पुनर्वसनासाठी लढा सुरु आहे.

मध्यप्रदेश, महाराष्ट्र व गुजरात या तीन राज्यामधील विकासाच्या आधारावर सरदार सरोवर प्रकल्प उभा राहिला पण यामुळे विस्थापित झालेल्या लोकांना त्यांचे पुनर्वसन व्हावे यासाठी एक महिला नेतृत्वाने सामाजिक चळवळी उभी करून त्यांचे नेतृत्व केले आहे हे वाखाणण्याजोगे आहे.

**५) बाबा आढाव :**

डॉ. बाबासाहेब पांडुरंग आढाव हे पुणे येथूनच आपल्या समाज कार्याला सुरवात केली. त्यांची ओळख एक भारतीय सामाजिक कार्यकर्ते अशी निर्माण झाली आहे. लोक त्यांना 'बाबा आढाव" या नावाने ओळखतात. १९५२ च्या महाराष्ट्रातील दुष्काळजन्य परीस्थीती निर्माण झाली होती. काही हमाल/ हेड लोडर्सनी बाबा आढाव यांना उच्च किमंती आणि रेशनिंगच्या विरोधात सत्याग्रहामध्ये नेतृत्व करण्याची विनंती केली. त्यावेळी 'बाबा' यांना ३ आठवडे तुरुंगात शिक्षा भोगावी लागली. त्यानंतर त्यांनी असंघटीत क्षेत्राला कामाची समान संधी मिळावी यासाठी संघर्ष सुरु केला. १९६३ मध्ये भवानी पेठ पुणे मतदारसंघात नगरसेवक बनले १९६८ मध्ये पुन्हा निवडून आले. सामाजिक भेदभाव

असलेल्या लोकांच्या सुधारणा करण्याचे काम चालू ठेवले पुढे त्यांनी राजकीय क्षेत्रातून अलिप्त राहून समाज सेवेसाठी कार्यरत राहीले.

सामाजिक सुधारणा चळवळीमध्ये त्यांनी 'हमाल पंचायत' नावाची असंघटित कामगार संघटना स्थापना करणे हेड लोडर्स आणि मजूरांसाठी किमान वेतन लागू करणे तसेच 'एक गाव एक पानवटा' यासाठी त्यांचे उल्लेखनीय योगदान राहिले आहे. (wikitia.com)

**६) अण्णा हजारे : भ्रष्टाचार निर्मुलन चळवळ**

अण्णा हजारे हे भारतातील सामाजिक चळवळीतील नेतृत्व आहेत. त्यांचे मूळ नाव किसन बाबुराव हजारे आहे. त्यांनी भारतीय सैन्यदलातून सेवा निवृत्तीनंतर सामाजिक कार्यात प्रवेश केला आहे. ग्रामीण विकासाला चालना देण्यासाठी आणि सरकारी कार्यात पारदर्शकता वाढवण्यासाठी प्रयत्न केले. सार्वजनिक जीवनामध्ये होणाऱ्या भ्रष्टाचाराची चौकशी व शिक्षा करण्यासाठी भ्रष्टाचार निर्मुलन चळवळीचे नेतृत्व केले. अण्णा हजारे यांनी सार्वजनिक कार्यात पारदर्शकता निर्माण व्हावी यासाठी वारंवार उपोषणाचा मार्ग अवलंबला आहे. त्यांनी भ्रष्टाचार विरोधी चळवळ, पाणलोट विकास कार्यक्रम आणि माहितीचा अधिकार हे मुद्दे अग्रस्थानी ठेवले यासाठी भारत सरकारकडे लोकपाल विधेयकानुसार भ्रष्टाचार विरोधी कठोर कारवाई करण्यासाठी उपोषण केले. त्यांनी स्वत:च्या गावामध्ये अमुलाग्र बदल घडवून आणले. गावातील पाणी व्यवस्थापन कार्यात त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. तसेच पर्यावरण संतुलन राहण्यासाठी वृक्षारोपण सारखे उपक्रम राबविले आहेत.

एकूणच महाराष्ट्रातील आणि भारत देशातील भ्रष्टाचार विरोधी मोहिमेचे नेतृत्व त्यांना मिळते. देश सेवा, सामाजिक कार्य हे त्यांचे प्रमुख आदर्श आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल १९९० साली पद्मश्री आणि १९९२ साली पद्मभूषण पुरस्कार प्रधान करून भारत सरकारने गौरविले आहे.

**समारोप:**

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये समाजात असणारे अनेक सार्वजनिक प्रश्न सामाजिक चळवळीद्वारे सोडविण्याचा प्रयत्न झाला आणि यामधूनच नेतृत्व निर्मिती झाली. सर्वप्रथम कृषीप्रधान देशामध्ये शेतकरी चळवळी निर्माण झाल्या. नागरिकांना ज्ञात झाले कि आपले हक्क आणि अधिकार मिळवण्यासाठी सामुहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे आणि यामधूनच समाजामध्ये विविध चळवळी उदयास आल्या. प्रामुख्याने शेतकरी चळवळ/ कृषी चळवळ, शैक्षणिक चळवळ, पर्यावरण चळवळ, कामगार चळवळ, भ्रष्टाचार निर्मुलन चळवळ इत्यादी प्रमुख चळवळी सक्रीय झाल्या.

देशाच्या विकासामध्ये आणि सार्वजनिक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी सामाजिक चळवळीचे महत्व नाकारता येत नाही. शेतकऱ्याच्या उत्पादनावर प्रक्रिया करणारे अनेक औद्योगिक उद्योग निर्माण झाले पण शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नसल्याने महराष्ट्र राज्यात व देशात शेतकरी चळवळ उदयास आली. शरद जोशी, राजू शेट्टी व रघुनाथ दादा यांच्या माध्यमातून शेतकरी चळवळीला चालना मिळाली. स्वातंत्र्योत्तर कालखंडात शैक्षणिक चळवळी उदयास आल्या. प्रामुख्याने कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बापुजी साळुंखे व मामासाहेब जगदाळे इ नेतृत्वाने शिक्षण प्रसारमध्ये अनमोल योगदान दिले आहे. त्याचबरोबर बाबा आढाव यांनी असंघटीत कामगारांच्या हक्कासाठी चळवळीचे नेतृत्व केले. मेधा पाटकर एक महिला नेतृत्व म्हणून नर्मदा बचाव आंदोलनामध्ये सक्रीय राहिल्या. तसेच संपूर्ण देशाला भ्रष्टाचार निर्मुलन करून पारदर्शकता निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न करणारे अण्णा हजारे यांचे नेतृत्वाखाली समाज एकजूट होऊन जो लढा दिला त्यातून भ्रष्टाचार विरोधी लोकांना जागृत करण्यात अण्णा हजारे यशस्वी झाले असे आपणास म्हणता येईल. अशा समाजात विविध चळवळीनी समाजातील सार्वजनिक प्रश्नांवर मात करुन देश सक्षम व सुदृढ बनविण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ:**

1. चव्हाण रमेश, कर्मवीर भाऊराव पाटील, एक दर्शन, रा.ना.चव्हाण –प्रतिष्ठान, पुणे.
2. साळुंखे शरद, शिक्षण महर्षी डॉ बापुजी साळुंखे दैनदिनी, श्री स्वामी विवेकानंद संस्था, कोल्हापूर
3. गव्हाणे किशोरकुमार, शिंदे सुखदेव, महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास (१८०० ते १९६०) एज्युकेशन पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्यूटर्स, गौकुळवाडी
4. अिंगळे व. न., ज्ञानतपस्वी कर्मवीर डॉ मामासाहेब जगदाळे याचं जीवनचरित्र', साकेत प्रकाशन प्रा.लि. औरंगाबाद